

पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धा यशस्वी करावी-अजित पवार

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे


www.metrocityvrutant.in | शनिवार दिनांक 23/08/2025 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 188 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# प्रभाग रचनेत कोणताही बदल नाही

## महानगरपालिका निवडणूक प्रारूप प्रभाग नकाशा जाहीर

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ - प्रारूप प्रभाग नकाशा




राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

| | |
|---|---|
| एकूण जागा | १२८ |
| निवडणूक प्रभाग ४ जागांचा प्रभाग | ३२ |
| एकूण प्रभाग | ३२ |

| लोकसंख्या (सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे) | | |
|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
| १७२७६९२ | २७३८१० | ३६५३५ |

| प्रभाग क्रमांक | एकूण लोकसंख्या | अनुसुचित जाती | अनुसुचित जमाती |
|---|---|---|---|
| १ | ५७१४९ | ७७५९ | ७५१ |
| २ | ५७६९४ | ७५३४ | ८२२ |
| ३ | ५१६२८ | ६८२८ | १०७५ |
| ४ | ५५५३९ | ७७९७ | ४२८६ |
| ५ | ४९०४९ | ५४३७ | १२१४ |
| ६ | ५३१२० | ४७०० | १८०० |
| ७ | ५३०६७ | ४६८३ | ८२८ |
| ८ | ५०१६४ | ७१९१ | १०९० |
| ९ | ५९३९० | ११६६३ | ६१० |
| १० | ५५६९९ | ९२९१ | ८६० |
| ११ | ५२८७८ | ९९६३ | ८६५ |
| १२ | ५७३१३ | ६८०६ | १२६० |
| १३ | ५५०७४ | १५७७० | ७०५ |
| १४ | ५६४२७ | ५३९१ | ५९५ |
| १५ | ५१८५६ | ३३९२ | ४५७ |
| १६ | ५९३३० | १०३३७ | १८६४ |
| १७ | ५९०८९ | ७८८९ | ८५७ |
| १८ | ५५०१२ | ४०७१ | ४४६ |
| १९ | ५४७६९ | २१५८७ | ३८९ |
| २० | ५३५४९ | ११११८ | ९३२ |
| २१ | ५६८०० | ९६७४ | ५२१ |
| २२ | ५८७१० | ७३३३ | ६३३ |
| २३ | ४९८४८ | १११३८ | ७१३ |
| २४ | ५०२४३ | ७०४७ | ७१९ |
| २५ | ४९९६४ | १०७७० | ११०५ |
| २६ | ४९८४७ | ७१७२ | १२१४ |
| २७ | ५०३२१ | ८१२८ | ६९८ |
| २८ | ५१५५० | ५५३७ | ६६२ |
| २९ | ४९१४६ | ८०४५ | ३३५६ |
| ३० | ५७००४ | १३०५६ | १९१२ |
| ३१ | ५१८४९ | ७५५४ | १५५८ |
| ३२ | ५४६१४ | ९०६९ | १७३८ |
| एकूण :- | १७२७६९२ | २७३८१० | ३६५३५ |

नगररचनाकार, सहाय्यक संचालक, नगररचना विभाग. | सहाय्यक आयुक्त, निवडणूक विभाग. | अतिरिक्त आयुक्त (२), पिं.चिं.मनपा. | आयुक्त तथा प्रशासक, पिं.चिं.मनपा

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग रचना निवडणूक विभागाने आज जाहीर केली या प्रभाग रचनेत 2017 च्या प्रभाग रचनेनुसारच आहे या प्रभाग रचनेत कोणताही बदल करण्यात आला नाही. प्रत्येक प्रभागा हा चार नगरसेवकांचा प्रभाग असेल, एकूण 32 प्रभाग आहेत सर्व प्रभागांचा मिळून एक नकाशा सुरुवातीला जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. पिंपरी चिंचवड शहरातील लोकसंख्या 17 लाख 27 हजार 692 असून त्यात अनुसूचित जातीची दोन लाख 73 हजार 810 आणि अनुसूचित जमातीची 36 हजार 535 दर्शविण्यात आली आहे. प्रभागाची सरासरी लोकसंख्या 53 हजार 990 आहे प्रभागातील कमल लोकसंख्या 59,389 तर किमान 48 हजार 590 आहे. प्रभाग रचनेत काहीतरी बदल होईल अशी अपेक्षा काही राजकारणी व इच्छुक उमेदवारांना होती परंतु तसे झाले नाही. राज्य निवडणूक आयोग यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना आधी सूचनेद्वारे 26 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीत प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हरकतींसाठी १४ दिवसांची मुदतप्रभाग रचनेवर चार सप्टेंबरपर्यंत हरकती व सूचना स्वीकारण्यात येणार आहेत. त्यानंतर पाच ते १२ सप्टेंबर या कालावधीत सुनावणी घेतली जाणार आहे. १३ ते १५ सप्टेंबर दरम्यान सुधारणांसह अंतिम प्रारूप रचना नगर विकास विभागाला सादर केली जाणार आहे. तीन ते सहा ऑक्टोबर या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाने अंतिम मंजुरी दिल्यानंतर महापालिका आयुक्त अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध करणार आहे.

# पिंपरी चिंचवड शहराची अशी असणार प्रभाग व्याप्ती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
नियोजित सार्वत्रिक निवडणूक

| प्रभाग क्रं. | व्याप्ती |
|---|---|
| 1 | चिखली गावठाण भाग, पाटीलनगर, गणेशनगर, मोरेवस्ती भाग, सोनवणे वस्ती इत्यादी., ऐश्वर्यम कोर्टयार्ड, शाईन सिटी इमारत इ. |
| 2 | चिखली गावठाण भाग, रिव्हर रेसिडन्सी, क्रिस्टल सिटी, स्वराज रेसिडन्सी ,गंधर्व एक्सलन्स, बनकर वस्ती, बोऱ्हाडेवाडी, वुडस व्हिला, जाधववाडी, राजे शिवाजीनगर, कुदळवाडी भाग इत्यादी. |
| 3 | मोशी गावठाण, गंधर्वनगरी, संत ज्ञानेश्वरनगर भाग, साई मंदिर परिसर, गोखले मळा, अलंकापुरम सोसायटी, वडमुखवाडी, काळजेवाडी, पठारेमळा, ताजणेमळा, चोवीसावाडी चऱ्होली, डुडुळगाव इ. |
| 4 | भाग १:- दिघी गजानन महाराज नगर, भारतमाता नगर, गायकवाडनगर , भंडारी स्कायलाईन, साई पार्क, समर्थनगर, कृष्णानगर, रुणवाल पार्क, विजयनगर, दिघी गावठाण , काटे वस्ती, इत्यादी. भाग २ :- व्ही.एस.एन. एल. गणेशनगर, रामनगर, बोपखेल गावठाण इत्यादी. |
| 5 | रामनगर, तुकारामनगर, गुरुदत्त कॉलनी, गंगोत्रीपार्क, सावंतनगर, महादेवनगर, गवळीनगर, श्रीराम कॉलनी, ज्ञानेश्वर नगर, चक्रपाणी वसाहत भाग इत्यादी. |
| 6 | धावडेवस्ती, भगत वस्ती, गुळवेवस्ती, चक्रपाणी वसाहत भाग, पांडवनगर, रोशल गार्डन परिसर, सदगुरूनगर इत्यादी. |
| 7 | शितलबाग, सेंच्युरी एन्का कॉलनी, सुविधा पार्क, आपटे कॉलनी, सॅन्डवीक कॉलनी, खंडोबामाळ, गव्हाणे वस्ती, भोसरी गावठाण, लांडेवाडी, शांतीनगर इत्यादी. |
| 8 | जय गणेश साम्राज्य, जलवायु विहार, केद्रींय विहार, पीएमआरडीए सेक्टर १२ गृहप्रकल्प, संत नगर, महाराष्ट्र कॉलनी, इंद्रायणीनगर, खंडेवस्ती, गवळीमाथा, बालाजीनगर, इत्यादी. |
| 9 | टाटा मोटर्स, यशवंतनगर, विठ्ठलनगर, उद्यमनगर, स्वप्ननगरी, पंतप्रधान आवास योजना, अंतरीक्ष सोसायटी, अजमेरा सोसायटी, वास्तूउद्योग, मासुळकर कॉलनी, महिंद्रा रॉयल, खराळवाडी, गांधीनगर, नेहरुनगर, महिंद्रा अँन्थिया हौ. सोसायटी इत्यादी. |
| 10 | संत ज्ञानेश्वर नगर (म्हाडा), मोरवाडी, लालटोपीनगर, अमृतेश्वर कॉलनी, इंदीरानगर, सरस्वती विश्व विद्यालय परिसर, आंबेडकर नगर, एच.डी.एफ.सी कॉलनी, दत्तनगर, विद्यानगर, शाहूनगर, वृंदावन सोसायटी, संभाजीनगर इत्यादी.. |
| 11 | नेवाळे वस्ती,हरगुडे वस्ती,कुदळवाडी भाग, कृष्णानगर, शरदनगर, कोयनानगर, महात्मा फुलेनगर, पुर्णानगर, शिवाजी पार्क, शिवतेज नगर, म्हेत्रे वस्ती, स्वस्त घरकुल प्रकल्प, अजंठानगर, दुर्गानगर इत्यादी. |
| 12 | तळवडे गावठाण, एम.आय.डी. सी., आय.टी.पार्क, ज्योतीबा मंदीर परिसर, सहयोगनगर, रुपीनगर, त्रिवेणीनगर म्हेत्रे वस्ती भाग, ताम्हाणे वस्ती भाग, शिवसृष्टी सोसा. परिसर तळवडे इत्यादी. |
| 13 | निगडी गावठाण, सेक्टर २२-ओटास्किम, यमुनानगर, माता अमृतानंदमयी मठ परिसर, श्रीकृष्ण मंदीर परिसर, साईनाथनगर इत्यादी. |
| 14 | चिंचवड स्टेशन, महावीर पार्क, मोहननगर, रामनगर, काळभोर नगर, ऐश्वर्यम सोसायटी, शुभश्री सोसायटी, जयगणेश व्हिजन, विवेकनगर, विठ्ठलवाडी, बजाज ऑटो, दत्तवाडी, तुळजाईवस्ती इत्यादी. |
| 15 | आकुर्डी गावठाण, गंगानगर, वाहतूक नगरी, सेक्टर नं.२४, २५, २६, २७, २७अ, २८, सिंधूनगर, परमार पार्क, स्वप्नपुर्ती सोसायटी, केंद्रीय वसाहत, एलआयसी, एक्साईज, इत्यादी. |
| 16 | वाल्हेकरवाडी भाग, गुरुद्वारा, नॅनोहोम सोसायटी, शिंदे वस्ती, रॉयल कासा सोसायटी, सेक्टर क्र.२९, रावेत, नंदगिरी सोसायटी, विकासनगर, क्रिस्टल सिटी, के.व्हीले. सोसायटी, के. टाऊन सोसायटी, सिल्व्हर ग्रेसिया सोसा., भालचंद्र विहार सोसा., सेलेस्टीयल सिटी फेज २, फेलिसिटी सोसा., मामुर्डी, किवळे इत्यादी. |
| 17 | दळवीनगर, प्रेमलोक पार्क, भोईर नगर, गिरीराज सोसायटी, रेलविहार सोसायटी भाग, शिवनगरी, नागसेननगर, आहेरनगर, वाल्हेकरवाडी गावठाण, चिंचवडेनगर, बळवंतनगर, बिजलीनगर, इत्यादी. |
| 18 | एस.के.एफ. कॉलनी, रस्टन कॉलनी, पवना नगर, वेताळनगर, चिंचवड गावठाण, केशवनगर, तानाजीनगर, काकडे पार्क, मोरया राज पार्क, दर्शन हॉल, माणिक कॉलनी, लक्ष्मीनगर, यशोपुरम सोसायटी इत्यादी. |
| 19 | विजयनगर, न्यू एस.के.एफ कॉलनी, उद्योगनगर, क्वीनस् टाऊन, सुदर्शननगर, श्रीधरनगर, आनंदनगर, भोईर कॉलनी, गावडे पार्क, एम्पायर इस्टेट, विस्डम पार्क, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलनी भाग, भिमनगर, निराधारनगर, सम्राट अशोकनगर, माता रमाबाई आंबेडकरनगर, बौध्दनगर, वाल्मीकीनगर, सॅनीटरी चाळ, भाटनगर, भाजी मंडई, पिंपरी कॅम्प इत्यादी. |
| 20 | विशाल थिएटर परिसर, एच.ए. कॉलनी, महेशनगर, संत तुकारामनगर, महात्मा फुलेनगर, वल्लभनगर, लांडेवाडी झोपडपट्टी, सी.आय.आर.टी., पार्श्वनाथ सोसायटी, कासारवाडी भाग, अग्रसेननगर, कुंदननगर भाग इ. |
| 21 | मिलिंदनगर, सुभाषनगर, गौतमनगर, आदर्शनगर, इंदीरानगर, शास्त्रीनगर, बलदेवनगर, गणेशनगर, जिजामाता हॉस्पिटल, संजय गांधीनगर, वैभवनगर, अशोक थिएटर, वैष्णोदेवी मंदीर, मासुळकर पार्क, पिंपरीगाव, तपोवन मंदीर, बालामल चाळ, कैलासनगर, ज्ञानेश्वरनगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलनी भाग इत्यादी. |
| 22 | काळेवाडी, विजयनगर, आदर्शनगर, पवनानगर, ज्योतीबा नगर भाग, नढेनगर, कोकणे नगर, राजवाडे नगर, इत्यादी. |
| 23 | प्रसुनधाम, गंगा आशियाना, कुणाल रेसिडेन्सी, स्विस कॉऊंटी, थेरगाव गावठाण, पडवळनगर भाग, पवार नगर, बापुजी बुवा नगर, जयमल्हार नगर भाग, धनगर बाबा मंदिर परिसर, अशोका सोसायटी, साईनाथनगर, समर्थ कॉलनी इत्यादी. |
| 24 | अदित्य बिर्ला हॉस्पिटल, दत्तनगर, पद्मजी पेपरमिल, ग्रिन्स हाऊसींग सोसायटी, गंगा ओशियन मिडोज, पडवळनगर भाग, गणेशनगर, म्हतोबानगर, प्रथम सोसायटी, क्रांतीनगर, महाराष्ट्र कॉलनी, यशदा कॉलनी, गुजरनगर, मंगलनगर, बेलठिकानगर भाग, इत्यादी. |
| 25 | माळवाडी, पुनावळे, पंढारे वस्ती, काटेवस्ती, नवले वस्ती, ताथवडे, अशोकानगर, निंबाळकरनगर, भुमकरवस्ती, वाकड, काळा-खडक , मुंजोबानगर, मानेवस्ती, भुजबळ वस्ती, वाकडकर वस्ती, केमसे वस्ती, रोहन तरंग सोसायटी, प्रिस्टाईन सोसायटी, स्वरा प्राईड रेसीडेन्सी इत्यादी. |
| 26 | पिंपळे निलख, विशालनगर, पार्कस्ट्रीट, कस्पटेवस्ती, अनमोल रेसिडेन्सी, धनराज पार्क, दत्तमंदीर परिसर, अण्णाभाऊ साठेनगर, वेणुनगर भाग, रक्षक सोसायटी, भारत इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी. |
| 27 | तापकीरनगर, श्रीनगर, शिवतीर्थनगर, बळीराम गार्डन, रहाटणी गावठाण, तांबे शाळा परिसर, सिंहगड कॉलनी, रायगड कॉलनी, लक्ष्मीबाई तापकीर शाळा परिसर, एस.एन.बी.पी. स्कूल परिसर, रॉयल ऑरेंज काऊंटी, आकाशगंगा सोसायटी इत्यादी. |
| 28 | फाईव्ह गार्डन, शिवार गॉर्डन, प्लनेट मिलेनीयम, कापसे लॉन, रामनगर, पिंपळे सौदागर, कुणाल आयकॉन, रोझ लॅंड, गोविंद गार्डन इत्यादी. |
| 29 | कल्पतरू इस्टेट, क्रांतीनगर, काशिद पार्क, गगनगिरी पार्क, जवळकरनगर, शिवनेरी कॉलनी, गुलमोहर कॉलनी, ओंकार कॉलनी, श्रीकृण नगर, गोकुळ नगरी, भालेकरनगर, पिंपळेगुरव, सुदर्शन नगर, वैदूवस्ती, इत्यादी. |
| 30 | शंकरवाडी भाग, सरीता संगम सोसायटी, शास्त्रीनगर, केशवनगर, कासारवाडी भाग, हिराबाई लांडगे झोपडपट्टी, जवळकर कॉलनी, फुगेवाडी, संजयनगर, दापोडी, सिध्दार्थ नगर, गणेशनगर, सुंदरबाग कॉलनी, एस.टी वर्क शॉप इत्यादी. आनंदवन, SMS कॉलनी, जयभिमनगर, महात्मा फुले नगर. |
| 31 | भाग-१: राजीव गांधीनगर, गजानन महाराज नगर, किर्ती नगर, विनायकनगर, गणेशनगर, कवडेनगर, मयुरनगरी, रामनगर, गांगार्डेनगर भाग, विद्यानगर, ज्ञानेश पार्क, स्वामी विवेकानंद नगर, समता नगर, राजाराम नगर, ढोरे पाटील फार्म, CME कॉलनी, संत तुकारामनगर, आनंद पार्क भाग इत्यादी.<br>भाग-२: ऊरो रुग्णालय. |
| 32 | सांगवी गावठाण, कुंभार वाडा, गंगानगर, आनंदनगर, मधुबन सोसायटी, ढोरेनगर, पवारनगर, शिंदेनगर, मुळानगर, लक्ष्मीनगर, चंद्रमणी नगर, जयमालानगर, उषकाल सोसायटी, पवनानगर, संगमनगर, प्रियदर्शनी नगर, पी.डब्ल्यू.डी. कॉलनी, एस. टी. कॉलनी, ममतानगर,<br>शितोळेनगर, पुष्पापार्क, कृष्णानगर, साईराज रेसीडेंसी, सह्याद्री कॉलनी, श्रीनगर, बासिलिओ सोसायटी, शिवदत्तनगर, शिवरामनगर इ. |

# विवाहाचे आमिष दाखवून महिलेची लाखांची फसवणूक !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : विवाहाच्या आमिषाने चोरट्याने एका महिलेची ३ लाख २३ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी बाणेर पोलिसांकडून माहिती-तंत्रज्ञान कायदा आणि फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका महिलेने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला बाणेर भागात राहायला आहेत. चोरट्याने महिलेच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. पुतण्याचा विवाह करायचा आहे, असे चोरट्याने महिलेला सांगितले होते. आरोपीने एका नामवंत इलेक्ट्रॉनिक कंपनीत कामाला असल्याची बतावणी केली होती. त्यानंतर महिलेला जाळ्यात ओढून विवाहसाठी काही इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी करायच्या आहेत, असे सांगून महिलेकडून वेळोवेळी तीन लाख २३ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने घेतले. महिलेने पैसे जमा केल्यानंतर तिला इलेक्ट्रॉनिक वस्तू देण्यात आल्या नाहीत. महिलेने मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा मोबाइल क्रमांक बंद असल्याचे लक्षात आले. महिलेने नुकतीच बाणेर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. वरिष्ठ




पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.

# स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयासाठी पाठपुरावा

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय स्थापन करण्याची मागणी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. सद्यस्थितीत नागरिकांना व रास्तभाव दुकानदारांना अन्नधान्य वितरणाशी संबंधित कामांसाठी थेट पुणे कार्यालयात जावे लागते. यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत, असे लांडगे यांनी नमूद केले आहे.

पिंपरी-चिंचवडसह देहू कॅन्टोनमेन्ट, देहू नगरपंचायत व काही भागांतील एकूण लोकसंख्या ३० लाखांच्या घरात असून, भोसरी, चाकण, तळेगाव, हिंजवडीसारख्या औद्योगिक पट्ट्यांमुळे स्थलांतरितांची संख्या झपाट्याने वाढत आहे. अशा वेळी,



फक्त तीन परिमंडळ अन्नधान्य कार्यालयांवर कामकाजाचा वाढता भार पडत असल्याने नागरिक व दुकान चालकांना पुण्यात जावे लागते. त्यात वेळेचा अपव्यय होतो, असेही आमदार लांडगे यांनी नमूद केले.

सोलापूरसारख्या शहरात केवळ ११ लाख लोकसंख्येसाठी स्वतंत्र अन्नधान्य कार्यालय कार्यरत आहे, याची उदाहरणासह तुलना देत लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडसारख्या वाढत्या लोकसंख्येच्या शहरात स्वतंत्र कार्यालयाची गरज अधोरेखित केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीची गंभीर दखल घ्यावी व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय तातडीने सुरू करावे, अशी विनंती आमदार लांडगे यांनी आपल्या पत्रात केली आहे.

**स्वतंत्र कार्यालय स्थापन झाल्यास होणारे फायदे -**

1. सामान्य नागरिकांच्या अडचणी दूर होतील.
2. रास्तभाव दुकानदारांचे कामकाज अधिक सुलभ होईल.
3. शासकीय कर्मचाऱ्यांचा वेळ आणि श्रम वाचेल.
4. शासकीय कामकाजात गतिमानता येईल.
5. लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या समस्या तात्काळ मार्गी लावता येतील.

> "पिंपरी-चिंचवडसारख्या ३० लाख लोकसंख्येच्या औद्योगिक आणि वेगाने वाढणाऱ्या शहरात अन्नधान्य वितरणासाठी स्वतंत्र अधिकारी कार्यालय असणे ही काळाची गरज आहे. नागरिक आणि रास्तभाव दुकानदारांना पुण्यात धावपळ करण्यापेक्षा स्थानिक स्तरावरच सेवा उपलब्ध झाल्यास कार्यक्षमता वाढेल आणि जनतेचे हाल टळतील."
>
> **– महेश लांडगे,**
> आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# एस.बी. पाटील कॉलेज मध्ये विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : जलदिंडी च्या माध्यमातून पवना नदीचा उगम शोधताना लक्षात आले की, या नदीत शहरी भागात सांडपाणी सोडले गेल्याने ती प्रदूषित झाली आहे. तसेच वाढत्या शहरीकरणामुळे नदी प्रदूषणासारख्या अनेक समस्यांमुळे नागरिक त्रस्त झालेले आहेत. त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आता वास्तू विशारद यांनी सर्व बाजूंनी विचार करून, सर्व समावेशक विकास प्रकल्प सादर करावे अशी अपेक्षा जलदिंडी या नदी सुधार क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थेचे संचालक राजीव भावसार यांनी व्यक्त केली.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) च्या एस.बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन या महाविद्यालयाच्या



विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला.

यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी, प्राध्यापक, कर्मचारी, यशस्वी विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे आर्किटेक्ट प्रतिक देशमुख यांनी सांगितले की, कठोर परिश्रम आणि प्रयत्नात सातत्य ठेवले की यश आणि श्रेष्ठतेचा मार्ग सापडतो. शहरी भागात आता परवडणारी पर्यावरण पूरक घरे निर्माण करण्यात येत आहेत.

यामध्ये नैसर्गिक संसाधनाचा वापर करून उच्च तंत्रज्ञान युक्त नागरी सेवा, सुविधा प्रकल्प उभारणी साठी वास्तू विशारद यांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी अंतिम वर्षात प्रथम ऐश्वर्या गराडे, द्वितीय संयुजा पारवे व तृतीय ऐश्वर्या नायर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

नाशिक महानगरपालिका तर्फे झालेल्या स्पर्धेत यशस्वी विद्यार्थी कृतिका कदम, इशिका नारखेडे, तन्वी खोचरे, कुणाल कुंभार, निपुण कोसरे, मृणाल जाधव, श्रुतिका वर्णेकर, अदित्री केंकरे, कादंबरी कुंभार आणि मार्गदर्शक आर्किटेक्ट नीलिमा भिडे, श्रेया कानडे, ऋतुजा माने यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पीडीए आर्किटेक्ट फॉर्म तर्फे पुणे येथे झालेल्या एमसीए आंतराष्ट्रीय क्लब हाऊस स्पर्धेत यश मिळवलेले भाग्यश्री चौधरी, वेदांत गरुड, ईशा डुंबरे, हिमांशु वाघ, सिद्धी सावंत, यश नेहरकर, तिशा केला, गणेश मुदावत यांचा आणि मार्गदर्शक आर्किटेक अजय हराळे, रोशनी देशपांडे, दक्षा देशमुख यांचा देखील सत्कार करण्यात आला.

आयआयटी कानपूर येथे झालेल्या कार्यशाळेत राष्ट्रीय स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी दिशा प्रधान, आदित्य बरगे या विद्यार्थ्यांचा आणि त्यांचे मार्गदर्शक प्रा. प्राची देशपांडे यांचाही सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन प्रा. बिजल वखारिया व श्रेयसी शिंदे आणि आभार प्रा. शिल्पा पाटील यांनी मानले.

# पावसाळी अधिवेशनात 27 विधेयके मंजूर!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नवी दिल्ली : महिनाभर चाललेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनाची गुरुवारी सांगता झाली.

वारंवार व्यत्यय, तहकूब आणि सभात्यागानंतरही लोकसभेत १२ आणि राज्यसभेत १५ अशी एकूण २७ विधेयके मंजूर करण्यात आली.

पावसाळी अधिवेशनाला २१ जुलैपासून सुरुवात झाली होती. या वेळी ‘ऑपरेशन सिंदूर’वरील चर्चावगळता दोन्ही सभागृहांमध्ये फारसे कामकाज झाले नाही.

अधिवेशनात सुरुवातीला विरोधकांनी ‘ऑपरेशन सिंदूर’वर चर्चेची मागणी केली होती. त्यानंतर बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेवर चर्चा करण्याच्या मागणीसाठी विरोधकांनी सभागृहात गोंधळ घातला. वारंवार येणाऱ्या व्यत्ययामुळे सभागृहाचे कामकाज अनेकदा तहकूब करावे लागले.

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यसभेत कोणत्याही व्यत्ययाशिवाय मंजूर झालेले ‘द बिल ऑफ लेडिंग बिल २०२५’ विधेयक वगळता, इतर विधेयके गदारोळात चर्चेनंतर



किंवा विरोधी पक्षांनी सभात्याग केल्यानंतरच मंजूर करण्यात आली. यंदा संसदेत खूप गोंधळ झाला. विरोधकांनी सरकारी पक्षाला सहकार्य केले नाही. विरोधकांनी अनेक महत्त्वाच्या विधेयकांवरील चर्चेत भाग घेतला नाही, असे एका सरकारी अधिकाऱ्याने सांगितले.

# पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धा यशस्वी करावी-अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे - पुणे ग्रँड चॅलेंज टूर, सायकल स्पर्धेच्या संदर्भात सर्व विभागांनी आपल्या कामकाजाचे सूक्ष्म नियोजन करून समन्वयाने काम करून स्पर्धा यशस्वी करावी. असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित,पुणे ग्रँड चॅलेंज टूर सायकल स्पर्धेत संदर्भात आढावा बैठकीत पवार बोलत होते.यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय चौबे, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, क्रीडा आयुक्त शीतल



उगले,जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पी एम आर डी ए चे महानगर आयुक्त योगेश म्हसे, पोलीस अधिक्षक संदिपसिंह गिल्ल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.पवार म्हणाले, पुणे ग्रँड चॅलेंज टूर ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा असून पुण्यात ही स्पर्धा प्रथमच होत आहे. या स्पर्धेच्या उत्तम प्रकारे आयोजनासाठी सर्वांनी सहकार्य करावे, या संदर्भात विभागीय आयुक्त यांनी दर 15 दिवसांनी बैठक घेऊन कामकाजाच्या प्रगतीचा आढावा घ्यावा, शासनासाठी हा एक महत्त्वाचा उपक्रम असून याचे उत्तम प्रकारे आयोजन करण्याची जबाबदारी सर्व यंत्रणांवर आहे त्या दृष्टीने सर्वांनी सहभाग घेऊन काम करावे अशा सूचना घेऊन पवार पुढे म्हणाले, शहरात बेकायदेशी होर्डिंग लावू देऊ नका शहराचे विद्रूपीकरण खपवून घेतले जाणार नाही अधिकृत असलेल्या होर्डिंग वरच बॅनर लावावीत या संदर्भात महापालिकेने दक्षता घ्यावी. असे त्यांनी सांगितले.या उपक्रमाचे सर्व काम गुणवत्ता पूर्ण झाले पाहिजे याकडे लक्ष द्यावे पुणे महापालिका व सार्वजनिक बांधकाम विभागाने आपापल्या हद्दीतील कामे 30 नोव्हेंबर 2025 पर्यंत पूर्ण करावीत असे निर्देश पवार यांनी यावेळी दिले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579

# भव्यदिव्य सेटवर चित्रित होणाऱ्या 'घबाडकुंड'चीच हवा

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



आयुष्यात आलेल्या कितीही अडचणी आपण पार करत यशाची शिखर गाठलं असलं तरी एकदातरी आपल्याला लॉटरी लागावी, अचानक खात्यात काहीही न करता बक्कळ पैसा यावा वा एखाद घबाड हाती लागावं असं वाटतं. पण या सगळ्या म्हणायच्या गोष्टी आहेत, खऱ्या आयुष्यात कष्टाशिवाय पर्याय नाही असं म्हणतात तेच खरं. हो. पण एखाद घबाड हाती लागायची इच्छा काही मनातून जात नाही. अशाच प्रकारच्या घबाडाची आणि त्याचा शोध घेणाऱ्यांची गोष्ट 'घबाडकुंड' या आगामी मराठी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाच्या लक्षवेधी शीर्षकासह या चित्रपटाचा भव्यदिव्य, खर्चिक, आणि नेत्रदीपक असा सेट अधिक लक्षवेधी ठरला. अर्थात मोठया पडद्यावर हा सेट प्रेक्षकांना नक्कीच खुर्चीत खिळवून ठेवायला मदत करेल.

ॲक्शन, विनोद, रहस्य असा सगळा भरगच्च मसाला असलेला 'घबाडकुंड' चित्रपट सादरीकरणाच्या दृष्टीने प्रेक्षकांसाठी ट्रीट असणार आहे. 'घबाडकुंड' या चित्रपटाची कथा रहस्यमय असून, यात बऱ्याच् चमत्कारीक गोष्टी घडताना दिसणार आहेत. दिग्दर्शक प्रीतम एस. के. पाटील, निर्माते रसिक कदम आणि सह निर्मात्या स्मिता पायगुडे अंजुटे यांच्या साथीने सस्पेन्स थ्रिलर जॉनर प्रेक्षकांसाठी घेऊन आले आहेत. चित्रपटासाठी पुण्याजवळील खेड-शिवापूर येथे सिनेमाचा सेट उभारला आहे. १० ते १२ हजार स्क्वेअर फुटांच्या जागेवर भव्य सेट उभारण्यात आला आहे. या सेटवर पाण्याची कुंड, खोलवर गेलेल्या विहिरी, पुरातन मंदिरे, गुहा, त्यातून जाण्या-येण्याचे मार्ग यांचा वापर गूढ निर्माण करणारी रहस्यमय दृश्ये चित्रीत करण्यासाठी केला जाणार आहे.

मराठीत प्रथमच अशाप्रकारे भव्य-दिव्य सेट तयार करण्यात आला आहे.या चित्रपटात रहस्य, थरार, विनोदाच्या जोडीला नात्यांची गुंतागुंतही पाहायला मिळणार आहे. घबाडाचा शोध घेताना अनाहूतपणे एकमेकांवर दाखवला जाणारा अविश्वास आणि त्यातून निर्माण होणारे संशयी वातावरण उत्सुकता वाढवणार आहे. चित्रपटात देवदत्त नागे, कुशल बद्रिके, संदीप पाठक, शशांक शेंडे प्राजक्ता हनमघर, स्मिता पायगुडे-अंजुटे, वैष्णवी कल्याणकर, रॉकी देशमुख, आरोही भोईर, साहिल अनलदेवर आदि कलाकारांची फौज मनोरंजनासाठी सज्ज झाली आहे.

व्हेलेंटिना इंडस्ट्रीज लि. चे विशेष सहकार्य लाभलेला 'घबाडकुंड' चित्रपट मराठी, हिंदी, तेलगू अशा तीन भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या लेखनाची जबाबदारी संजय नवगिरे, अक्षय धरमपाल यांची आहे. कलादिग्दर्शन योगेश इंगळे, छायांकन योगेश कोळी तर संकलन सौमित्र धाराशिवकर यांचे आहे. कार्यकारी निर्माता म्हणून आकाश जाधवने बाजू सांभाळली आहे. साऊथचे प्रसिद्ध फाईट मास्टर कार्तिक यांनी या चित्रपटासाठी साहसदृश्याची जबाबदारी सांभाळली आहे.

# आयएसबीॲंडएम पुणे येथे आंतरराष्ट्रीय एफडीपीचे आयोजन

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : इंटरनॅशनल स्कूल ऑफ बिझनेस अँड मीडिया (ISB&M), पुणे येथे “उत्कृष्ट दर्जाचे संशोधन डिझाईनिंग व पब्लिशिंग” या विषयावर आंतरराष्ट्रीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (F D P ) 2025 पार पडला. संस्थापक-अध्यक्ष डॉ. प्रमोद कुमार व डॉ. अरुण जोशी यांच्या सहकार्याने आयोजित या चार दिवसीय हायब्रीड कार्यक्रमात ६५ हून अधिक संशोधक सहभागी झाले.

या कार्यक्रमात डॉ. मीना बेईगी (साउथॅम्प्टन बिझनेस स्कूल, यूके), डॉ. रमाधार सिंह, डॉ. प्रवीण कुमार (बार्कलेज इंडिया) यांच्यासह आंतरराष्ट्रीय प्राध्यापकांनी संशोधन पद्धतीशास्त्र, डेटा ॲनॅलिटिक्स, Smart PLS, SPSS, बिब्लियोमेट्रिक्स व मेटा-ॲनॅलिसिस यावर मार्गदर्शन केले.

डॉ. अरुण जोशी यांनी सांगितले की एफडीपीचा उद्देश “जिज्ञासा-केंद्री संशोधन संस्कृती विकसित करणे” हा आहे. तर डॉ. प्रमोद कुमार म्हणाले, “एक प्रभावी पीजीडीएम संस्था दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व शैक्षणिक उत्कृष्टतेतून उद्याचे जागतिक बिझनेस लीडर्स घडवते. हे एफडीपी त्या ध्येयाचे प्रतीक आहे.”